# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. काशिनाथ आबा कुणकेकर ,<br>मु. नंद्याळ, पो. मुगळी, ता. कागल, जि. कोल्हापूर | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण २ विभागीय कार्यालय, कोल्हापूर<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय मुरगुड, जि. कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. काशिनाथ आबा कुणकेकर, मु. नंद्याळ, पो. मुगळी, ता. कागल, जि. कोल्हापूर या ग्राहकाने शेतीपंप जोडणी उशिरा दिल्याबद्दल नुकसान भरपाई मिळावी तसेच झालेले शेतीचे नुकसान त्याचीही भरपाई रु. ४,००,०००/– मिळावेत म्हणून मंचाकडे प्रतिनिधी श्री. सोमेश्वर शिंगे यांचेमार्फत १८.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली आहे.

मंचात येण्यापूर्वी अंतर्गत कक्ष, कोल्हापूर यांचेकडे ७.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली होती. तथापि सदर तक्रारीचा निर्णय मान्य न झालेने ग्राहकाने प्रतिनिधी मार्फत मंचात तक्रार दाखल केली आहे. मंचाने तक्रार दाखल करुन घेवून वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व दि. १९.४.२०१० रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी स्वत: ग्राहक उपस्थित होते. तसेच नोडल ऑफीसर श्री. आडके, मुरगुड उप विभागाचे सहाय्यक अभियंता वाय.एन. शंभोलिंगय्या व कनिष्ठ अभियंता कापशी श्री. सुरेश जोगी उपस्थित होते.

मंचात तक्रारी जास्त प्रमाणात दाखल झाल्या आहेत व १ सप्टेंबर २००९ ते ऑक्टोबर २००९ या दोन महिन्याच्या कालावधीत मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य हि पदें रिक्त असल्याने दोन महिन्याच्या कालावधीमध्ये निर्णय होवू शकला नाही.

सुनावणी दरम्यानची कथने, मूळ तक्रार अर्ज, वि.प.ने सादर केलेली कागदपत्रे या सर्वांचे अवलोकन करता मंचास खालील मुद्दे निष्कर्षासाठी उद्भवतात.

मुद्दा क्र. १) ग्राहकाने नेमका कोणत्या तारखेस रकमेचा भरणा केला आहे ?

उत्तर : ग्राहकाने दि. २९.१२.१९९४ व दि. १३.१२.१९९५ अशा दोन वेळेला एकूण २८२०/- भरलेले आहेत.

मुद्दा क्र. २) रक्कम जमा केल्यावर चाचणी अहवाल दिला होता किंवा कसे ?

उत्तर : रक्कम जमा केल्यानंतर दि. १७.७.२००७ रोजी तपासणी अहवाल दिला आहे.

मुद्दा क्र. ३) तपासणी अहवाल दिल्यानंतर वीज जोडणीचे काम होण्यास विलंब झाला आहे काय ?

उत्तर : होय. चाचणी अहवाल दिल्यानंतर दि. २.१.२०१० पर्यंत विलंब झाला आहे.

मुद्दा क्र. ४) सदर विलंबासाठी भरपाई देणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय. अशी भरपाई विनियमातील तरतुदीनुसार देणे योग्य आहे.

मुद्दा क्र. ५) आदेश

उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

श्री. कुणकेकर मु.पो नंद्याळ ता. कागल यांनी गट क्र. ३०० मध्ये ५ अ.श.साठी विद्युत जोडणी मिळणे करिता दि. २९.१२.१९९४ व १३.१२.१९९५ अशा दोन वेळेला रकमा अनुक्रमे रु. ५००/- व रु. २३२०/- जमा केलेल्या दिसून येतात. सदर रकमा जमा केल्यानंतर उभयबाजूंनी कोणताच पत्र-व्यवहार झालेला दिसत नाही. दफ्तरी दाखल जमा पावत्यांवर टेस्टेड ओ.के. असा शेरा मारुन एमजीडी नं. ५०३४ दि. १७.७.२००७ अशी तारखेची नोंद केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे पंतकृपा ट्रेडर्स यांच्याकडून घेतलेल्या सुप्रीम मेक पॉवर कपॅसिटर २ केव्हीएआर या बिलावर तसाच शिक्का मारल्याचे दिसून येत आहे. ग्राहकाने वि.प.कडून १७.७.२००७ रोजी कपॅसिटर तपासल्याचे सर्टीफिकेटही दफ्तरी दाखल केले आहे. या सर्व बाबी मुद्दाम नोंद कराव्या लागत आहेत. ग्राहकाने वि.प.ने मागणी केल्याप्रमाणे प्रथमत: रु. ५००/- व नंतर रु. २३२०/- इतकी रक्कम जमा केल्यावर व १७.७.२००७ रोजी तपासणी अहवाल दिल्यावर वास्तविकपणे वि.प.ने जोडणी देणे आवश्यक होते.

मात्र वि.प.ची आवश्यक ती एल.टी.लाईन पूर्ण नसल्याने व ती दिनांक २२.१२.२००९ पूर्ण झाल्याने तसे ग्राहकास कळवून नवीन चाचणी अहवालाची मागणी केल्याचे सहाय्यक अभियंता यांनी नमूद केले आहे.

मात्र सदरील पत्रामध्येच दि. १७.७.२००७ रोजी तत्कालीन शाखा अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून मोटार पेटी वगैरे जागेवर बसविले नसल्याचे ग्राहकास तोंडी सांगितले आहे. सर्व साहित्य जागेवर बसवून घ्या म्हणजे जोडणी देणे सुलभ होईल असे तोंडी सांगितले व कामाच्या व्यापात लेखी देण्याचे राहून गेल्याचे नमूद केले आहे हे लेखन वास्तव वाटत नाही असे मंचाचे मत आहे. दि. १७.७.२००७ रोजी कपॅसिटर तपासणी तसेच चाचणी अहवाल देणे या बाबी झाल्यावर लगेचच कनिष्ठ अभियंता पाहणी केली या बाबी अशक्यप्राय असल्याने वरील मत व्यक्त केले आहे. ग्राहकाने कक्षामध्ये तक्रार दाखल केल्यावर कक्षाने दि. ८.१.२०१० रोजी आपला आदेश पारित करुन ८ दिवसांत नवीन चाचणी अहवाल घेवून वीज जोडणी द्यावी असा आदेश दिला आहे. सदरचा आदेश सहाय्यक अभियंता, मुरगुड यांना १२.१.२०१० रोजी मिळाल्याचे दिसून येते. मात्र जोडणी दि. २.१.२०१० रोजीच दिली असल्याचे निष्पन्न होत आहे याचाच अर्थ कक्षात तक्रार दाखल केल्यावरच सत्वर जोडणी दिली हे सिध्द होत आहे. वास्तविकपणे ग्राहकास कक्ष वा मंच येथपर्यंत तक्रार करावयास भाग पाडणे हे योग्य नाही. सुनावणीच्यावेळी सहाय्यक अभियंता यांनी चाचणी अहवाल न दिलेल्या ग्राहकांसाठी २४.१०.२००७ च्या स्थानिक ‘ पुढारी ‘ दैंनिकात नोटीस देवून चाचणी अहवाल दि. ३१.१०.२००७ पूर्वी दाखल करावा असे नमूद केले आहे व तसा पेपर मंचात दाखल केला. तथापि, सदर नोटीसी वजा जाहीरातीमध्ये अर्जदार तक्रारदाराच्या नावाचा उल्लेख नाही ही बाब मुद्दाम नोंद कराविशी वाटते. तसेच सदरचे कनेक्शन हे १२ अेजी ग्रुपमध्ये मंजूर होते पैंकी इतर लोकांच्या जोडणीचे काय झाले हेही वि.प.ने नमूद केलेले नाही. तसेच दि. १७.७.२००७ रोजी जो चाचणी अहवाल दिला, त्यात ज्या कंपनीच्या मोटारची नोंद दिलेली आहे त्याऐवजी नवीन अहवाल देतांना दुसऱ्याच मोटारीची नोंद दिली हा मुद्दा वि.प.ने नमूद करुन दि. १७.७.२००७ रोजीचा चाचणी अहवाल खोटा आहे असे नमूद केले आहे. मंचास असे वाटते की, दि. १७.७.२००७ ग्राहकाने मोटार खरेदी करुन तसा अहवाल दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही, कारण त्यानंतरच्या दोन ते अडीच वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर वि.प.ने वीज लाईन तयार असल्याबद्दलचे कळविले आहे व तशी नोटीस दिल्यावर ग्राहकाने दि. १.१.२०१० रोजी नव्याने मोटार खरेदी करुन नवीन चाचणी अहवाल दिला आहे त्याबद्दल वि.प.ची कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे आपल्याकडून झालेला विलंब व त्यासाठी द्यावी लागणारी भरपाई रक्कम यापासून वाचण्यासाठी वि.प.ने कनिष्ठ अभियंत्याने तोंडी सांगितले व लेखी द्यायचे राहून गेले असे नमूद केले आहे. सबब दि. १७.७.२००७ नंतर दि. २.१.२०१० या विलंबासाठी विनियमातील तरतुदीनुसार भरपाई देणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे. म्हणून मुद्दा क्र. ४ चे उत्तर होय असे दिले आहे.

तक्रारदाराची तक्रार कामी हजर केलेली कागदपत्रे, सुनावणी दरम्यानची कथने, वि.प.चे म्हणणे, कक्षाचा निर्णय या सर्व बाबींचा एकत्र विचार करता, मंच खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) दि. १७.७.२००७ ते दि. २.१.२०१० या कालावधीसाठी म्हणजेच १२७ आठवड्यांसाठी विनियमातील तरतुदीसाठी प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/– या प्रमाणे रु. १२,७००/– इतकी भरपाई देण्यात यावी.

२) सदर भरपाई रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन बाकी रक्कम वि.प.ने ग्राहकास रोखीने अथवा चेकने द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :